बुधवार, दि ११ जून २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता

## दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. १० जुन व १४ जुन २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये.

विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी



लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम मंडळाच्या सदस्यपदी डॉ प्रमोद कुमावत व किरण देशमुख यांची निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नवीन शैक्षणिक धोरणामध्ये पहिल्यांदा पायाभूत शिक्षणाचा स्तर निर्माण करण्यात आला आहे यामध्ये अंगणवाडीचे तीन वर्षे, पहिली व दुसरी इयत्ता यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी हा अभ्यासक्रम तयार केला. यासाठी इंग्रजी विषयाचा पाठ्यक्रम तयार करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथील वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ प्रमोद कुमावत व जिल्हा परिषद प्रशाला नेर येथील वरिष्ठ शिक्षक किरण देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. यांनी तयार केलेला अभ्यासक्रम या वर्षी पासून महाराष्ट्रात लागू करण्यात आला आहे. हा पाठ्यक्रम मराठी माध्यमाच्या व इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांना लागू करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील दोन सदस्यांचा अभ्यासक्रम मंडळावर निवड झाल्याबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. आर डी कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता संजय येवते, अधिव्याख्याता योगेश्वर जाधव, डॉक्टर श्रीहरी दराडे, भारत सूर्यवंशी, सय्यद अख्तर, श्रीमती प्रेरणा मोरे, निलोफर पटेल,मनपाचे शिक्षणाधिकारी डॉ प्रकाश मांटे, डॉ राजेश गायकवाड तसेच जिल्हा परिषद प्रशाला नेर येथील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.



# वॉटरग्रीडच्या कामात हलगर्जीपणा करणारे कार्यकारी अभियंता, उपअभियंता निलंबित, निवृत्त अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी

## दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल होईपर्यंत शांत बसणार नाही- आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर, मंठा व जालना तालुक्यातील १७३ गांवे व मंठा तालुक्यातील ९५ गांवे ग्रीड पाणी या योजनेअंतर्गत सर्व गावांना पाणी पुरवठा सुरु झालेला नसतानाही कामाचे निविदेनुसार अंतिमीकरण करून योजनेचे लेखेजोखे बंद करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सदर अनियमितते प्रकरणी प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर बी गाढे, श्री. एम. बी. गायकवाड, शाखा अभियंता तथा तत्कालीन उप अभियंता (प्रभारी), श्री एस एस पटेल प्रभारी उपकार्यकारी अभियंता मजीप्रा उपविभाग, मंठा, परतूर यांचे निलंबन करण्यात आले असून रीटायर झालेले उप अभियंता श्री दांडगे व गाझी यांच्यासह इतर अधिकारी, यांचेविरुध्द दोषारोप बजावून विभागीय चौकशी चालू करण्यात आली आहे. असे असले तरी जोपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही तसेच परतूर विधानसभा मतदारसंघातील ५ लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला कदापि माफ करणार नाही अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

### काम पूर्ण करून घेण्याची आमच्यात धमक - लोणीकर

काम पूर्ण झाले असल्याचे खोटे अहवाल सादर करत २६ कोटी रुपयांचे अंतरिम बिल जरी अदा करण्यात आले असले तरी संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांकडून काम पूर्ण करून घेण्याची धमक आमच्या मध्ये आहे त्यामुळे पुढील महिन्याभरात परतुर व मंठा दोन्ही वॉटर ग्रेड्च्या माध्यमातून मतदार संघातील जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल काहीही झाले तरी कंत्राटदारासह संबंधित सर्व अधिकाऱ्यांना हे काम पूर्ण करावंच लागेल अन्यथा माझ्याशी गाठ आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित केल्यामुळे माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण व प्रचंड पाठपुराव्याला मोठे यश आले असून या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सदस्य सचिव व प्रधान सचिव यांच्या विरोधात आमदार बबनराव लोणीकर यांनी महामहीम राज्यपाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे तक्रार करत प्रधान सचिव व सदस्य सचिव हे या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असून या सर्व प्रकारांमध्ये हे देखील सहभागी असल्याचे शक्यता वर्तवली होती त्यानुसार प्रशासन तात्काळ अलर्ट मोडवर आले असून भ्रष्ट व दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येत असल्याचे आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव रवींद्र यांनी काढले आहेत. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर पान ३ वर



# जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या विना क्रमांकाच्या वाहनावर कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना उप प्रादेशिक कार्यालयामार्फत दि. ६ व ७ जून २०२५ रोजी जालना जिल्ह्यात विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये अवैध गौण खनिज वाळू वाहतूक करणाऱ्या नोंदणी क्रमांक प्रदर्शित न केलेल्या (विना नंबर प्लेट) एकुण ४६ वाहनांवर वायुवेग पथकाने कारवाई केली असून त्यापैकी २३ वाहने अटकावून ठेवण्यात आली आहेत. जिल्ह्यात अवैध वाहतूक रोखण्यासाठी आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली आहे. अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी दिली आहे.

**वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक**

जिल्ह्यातील वाहन चालक, मालकांनी आपल्या वाहनावर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) ही नवीनतम तंत्रज्ञानावर आधारित असून वाहनांच्या सुरक्षिततेसाठी तसेच गैरवापर रोखण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. यामुळे वाहन चोरी, नकली नंबर प्लेट आणि नियमांचे उल्लंघन होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) ची अंमलबजावणी करण्यात आली आहे. याकरिता प्रत्येक वाहनचालक, मालकांनी आपल्या वाहनाची अधिकृत नोंदणी करून हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) वाहनावर लावून वाहन सुरक्षितता आणि नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व नागरिकांनी यामध्ये सहकार्य करून अधिकृत हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (क्ष्डक्ष्ठ) बसवून वाहन रस्त्यावर चालवावे आणि नोंदणी क्रमांक प्रदर्शित न केलेल्या (विना नंबर प्लेट) रस्त्यावर चालवू नये. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा व पान ३ वर



# संपादकीय

## समाजवादी विचारवंत

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील  पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय  साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला.  पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर  सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## देळेगव्हाण ग्रामपंचायत कार्यालयात भगवा ध्वज उभारून राज्यभिषेक दिन साजरा

**टेंभूर्णी** - हिंदवी स्वराज्याचे  संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक दिन जाफराबाद तालुक्यातील देळेगव्हाण ग्रामपंचायत कार्यालयात साजरा मोठ्या उत्साहात  करण्यात आला.सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून ग्रामपंचायत कार्यालयासमोर भगवा ध्वज फडकाऊन गुढी उभारण्यात आली. यावेळी ग्रामविकास अधिकारी एस. बी.शिंदे,सरपंच वत्सलाबाई कापसे,ग्रामपंचायत सदस्य संतोष हिवाळे,साईनाथ  निलक,तुळशीराम गाढवे,डिंगाबर वरशीळ,ग्राम पंचायत कर्मचारी कैलास कापसे, राहुल वरशीळ, अमोल वरशीळ आदींसह गावकरी उपस्थित होते.



# आपली मुलगी श्रीमंत घरी खरंच सुखी राहील का?

आजकाल प्रत्येक आई वडिलांना वाटत आहे की, आपली मुलगी श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाला द्यावी.म्हणजे श्रीमंत घरी आपली मुलगी चैन विलासात राहील.तिला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासणार नाही. तिला सर्व भौतिक सुख-सुविधा जाग्यावर उपलब्ध होतील. ती ऐश्वर्यसंपन्न व राणीसारखे जीवन जगेल. सर्व भौतिक सुख-सुविधा तिच्या पायावर लोळण घेतील. समाजात व गावात आपली प्रतिष्ठा वाढेल. भावकीत व गावकीत मोठ्या अभिमानाने सांगता येईल की, माझी मुलगी खूप मोठ्या घरी दिली आहे. तिच्या घरी अमाप पैसा व संपत्ती आहे. अलिशान गाडी व अलिशान बंगला आहे.तिच्या घरात नोकर चाकर आहेत. तिच्या घरी कोणतीच व कशाचीच कमी नाही. असे नातेवाईकांना व भावकीला ठणकावून सांगण्यासाठी आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून प्रत्येक आई वडील आपल्या मुलींना श्रीमंत घरी देण्याचे स्वप्न पाहत आहेत. पण त्यासाठी तो मुलगा दारुडा व व्यसनी आहे का? आपल्या मुलीला खरंच सुखी ठेवेल का? का दारू पिऊन आपल्या मुलीला रोजच त्रास देईल? या गोष्टीचा विचार करणे हे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य आहे. केवळ मुलगा श्रीमंत आहे म्हणून कोणताही मागचा पुढचा विचार न करता मुलीला त्या घरी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे. पण आजकाल तेवढा विचार कोण करतोय? केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला मनपसंत श्रीमंत स्थळ बघतोय. आणि आपल्या मुलीचे लग्न एकदाचे उरकून टाकतोय. म्हणूनच आजकाल समाजात व गावात आपल्या मुलीला श्रीमंत घरी देण्याची प्रत्येक आई-वडिलांची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. त्यासाठी मुलींचे बिचारे आई-वडील दिवसभर शेतात जीवाचे रान करतात. वीट भट्टीची किंवा उसाची उचल घेऊन पैसा गोळा करतात, नसेल तर सावकाराचे कर्ज काढतात आणि ऐपत नसताना देखील केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलाला मनमानी हुंडा देऊन आपल्या मुलीला मोठ्या घरी देतात. मनमानी सोनं नाणं देऊन मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात.लग्न राजेशाही थाटात लावून देतात. लग्नाला गाव जेवण देतात. सर्व पाहुणे रावळे बोलावतात. आणि आपली व आपल्या मुलीची एकदाची हौस पूर्ण करतात. मुलगी नवऱ्या घरी नांदायला जाते. एक-दोन महिने नवरा व सासू-सासरे तिला चांगली वागणूक देतात. पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळतात. तिला खूप खूप जीव लावतात. तिकडे मुलीचे आई-वडील मात्र आता आपली मुलगी सुखाने व आनंदाने नांदत आहे म्हणून समाधानी असतात. त्या दोघांचा संसार सुखाने चालत असतो. पण त्यांच्या सुखी संसाराला कोणाची कुठून व कशी नजर लागते हे कळायला मार्ग नसतो. त्या मुलीचा नवरा दारुडा व व्यसनी निघतो. तिथूनच मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू होतो. तिच्या बावनकशी चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला नाहक नावे ठेवून बदनाम केले जाते. नवरा रोज दारू पिऊन येतो आणि तिला मारहाण करतो. तिला घाण घाण शिव्या देऊन तिच्या भावना दुखावतो.तुझ्या आई-वडिलांनी मला लग्नात काय दिले? तुझ्या आई वडिलांनी मला लग्नात खूप कमी हुंडा दिलाय. आता आणखीन हुंडारुपी म्हणून काहीतरी पैसे किंवा गाडी घेऊन द्यायला सांग. नाहीतर तू आमच्या घरातून निघून जा आणि तुझ्या आई-वडिलांकडेच जाऊन रहा. इकडे आमच्याकडे येऊ नकोस. अशा मागणीचा तगादा मुलीकडे लावतात.आणि त्या मुलीचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला घरातून बाहेर काढतात आणि माहेरचा रस्ता दाखवतात. ती बिचारी मुलगी मात्र आपल्या आई-वडिलांकडे जाते. आणि त्यांना सर्व हकीकत सांगते. तेव्हा आई-वडिलांना हे ऐकून खूप खूप दुःख वाटते. मुलीच्या आई वडिलांच्या मनात तर वेगळ्याच अपेक्षा राहतात. पण इथे तर वेगळेच काहीतरी होऊन जाते. त्यांच्या पायाखालची जमीन सरकते. त्यांना आभाळ फाटल्यासारखे होते. एवढे अतोनात दुःख त्यांना होते. आणि मग ते पश्चातापात पडतात. स्वतःला दोष देत बसतात. आता आपल्याला समाज काय म्हणेल? भावकी व नातेवाईक काय म्हणतील? या विचारांनी ते खूप हतबल होतात. हे प्रकार सध्या सर्वत्र सुरू आहेत. नुकतेच घडलेले वैष्णवी हगवणे प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. हे आपल्याला माहित आहे. वैष्णवी हगवणे हिला तिच्या आई-वडिलांनी मायंदळ हुंडा देऊन तिला श्रीमंत घरी दिले होते. पण श्रीमंत घरी तिच्यावर तिच्या नवऱ्याने व सासू-सासर्याने कसा अमानुषपणे मानसिक व शारीरिक छळ केला. हे आपण जाणून आहोत. आई-वडिलांना चांदीचे भांडे घेऊन द्यायला सांग म्हणून तिच्यावर वांरवार अमानुषपणे अत्याचार केला जात होता. नाहक तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बदनाम केले जात होते. या रोजच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून तिने आपली जीवनयात्रा संपवली. ही महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना आहे. समस्त भारतीयांना खूप खूप दुःख देणारी बाब आहे.याचा प्रत्येक आई-वडिलांनी जरूर विचार करावा. कारण मुलगी श्रीमंत घरी दिल्यावरच सुखी राहते हा आई-वडिलांचा गैरसमज आहे. हा गैरसमज प्रत्येक आई-वडिलांनी मनातून काढून टाकावा. आपली मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या याला माझा विरोध नाही. पण मुलगी केवळ श्रीमंत घरीच सुखी राहील हे मीच काय? कोणीही सांगू शकत नाही. जो मुलगा निर्व्यसनी व होतकरू आहे आणि आपल्या मुलीला आयुष्यभर चांगल्या प्रकारे जीव लावून सांभाळू शकतो अशाच निर्व्यसनी, होतकरू व चारित्र्यसंपन्न मुलाला आपली मुलगी जरूर द्या. तो आपल्या मुलीला राणी सारखा ठेवेल...त्यांच्या सुखी संसाराला कोणाचीच नजर लागणार नाही. आणि श्रीमंत घरी द्याल तर आपल्या मुलीचे वैष्णवी हगवणे प्रकरण झाल्याशिवाय राहणार नाही... एवढे ध्यानात ठेवा...



**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## आपली माणसे...

मतलबी जगात कुठेही वावरताना
दिसतात सगळे स्वतःचा विचार करताना...
कोणी धावत नाही कोणाच्या मदतीला
दिसतात सगळे देखाव्याचे ढोंग करताना...
कोणालाच राहिली नाही कोणाची परवा
जवळचे मित्रच म्हणतात याचे कान भरवा...
देतात लावून घरातल्या घरात भांडण...
लांबूनच बघतात लावून दिलेले भांडण...
हल्लीची दुनिया फार बिघडून गेली आहे...
एकमेकांचे भांडण लावणे त्यांचे तत्त्व झाले आहे...
सोबत राहणारे भांडण लावून नामानिराळे राहतात
मित्राचे झालेले भांडण बघण्यात धन्यता मानतात...
आजकाल बघ्याची भूमिका घेणारे फार वाढलेत....
भांडण सोडवण्यापेक्षा सेल्फी काढण्यात गुंग झालेत...
माणसाने माणुसकी कुठे गहाण ठेवली की काय?
माणसात कधी माणुसकीचे गुण येतील सांगता काय?
माणूस माणसासारखे वागू लागला तर होईल बरे
पण माणूस माणसासारखे वागेल का हो खरे...?
आता माणसात माणुसकी पेरणे काळाची गरज आहे...
माणुसकी विना माणसाला कसली किंमत आहे..?
माणसाने स्वार्थाला त्यागून निस्वार्थी बनावे...
प्रेमाने आणि आपुलकीने माणसांना जपावे...
संकटात पैसा येत नाही येतात माणसे कामाला...
मतलबी जगात हे लवकर कळेल का हो कोणाला..?
माणसांनो माणसे ओळखा नका बनू राक्षस...
आपल्याच माणसांचे का होता हो भक्षक...?
आपली माणसे आपलीच असतात...
ऐनवेळी संकटात तीच कामाला येतात...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# वटपौर्णिमा निमित्त सुहासिनींची जागोजागी गर्दी

**परतूर । प्रतिनिधी -** येथील पवार कॉलनी शिव मंदिरापाशी वडाचे झाड आहे या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महिलांची गर्दी पाहायला मिळाली वटपोर्णिमा दिवशी सकाळी अकरा वाजल्यानंतर चे पुजेचे मुहूर्त होते म्हणून सुहासिनी महिलांची जागोजागी पुजेसाठी गर्दी पाहण्यास मिळत होती. म्हणून या दिवशी वटवृक्षाची पूजा केली जाते वटवृक्ष हा अक्षय अशा प्राणाचे दर्शक आहे. परात्पर गुरु पांडे महाराज वटपोर्णिमा या व्रताचे महत्त्व शोरूपी वडाची पूजा करणे म्हणजे त्या वडाच्या माध्यमातून शिवरूपी पतीलाच एक प्रकारे त्याचे आयुष्य वाढून त्याची आयुष्यातील कम ला शिवाची जोड असते तर शक्ती आणि शिव यांच्या संयुक्त क्रियेने व्यवहारातील कर्म साधना म्हणून त्याचा जीवाला लाभ मिळण्यास साहाय्य होते म्हणून या दिवशी वडरूपातील शिवाला स्मरुन पतीला दीर्घायुष्य लाभण्यासाठी प्रार्थना करून कर्माला शक्ती शिव यांची जोड देऊन ब्रम्हांडातील शिवतत्त्वाचा यथायोग्य लाभ करून घ्यायचा असतो. असे अनेक परंपरागत पद्धतीने सन साजरा करण्यात येतो. याच निमित्ताने वटपौर्णिमेला सुहासिनी महिलांची गर्दी होती.



# वाळू माफियांच्या हल्ल्यात सावरखेडा गावातल्या तरुणाचा मृत्यू

**जाफ्राबाद -** वाळू माफियांनी घरामागे साठवलेल्या वाळूमुळे रहदारीसाठी अडचण होत असल्याची तक्रार देण्यासाठी जाफ्राबाद पोलीस ठाण्यात गेलेल्या तरुणासह त्याच्या दोन भावंडांवर वाळू माफियांनी हल्ला केलाय. या घटनेत एका ३५ वर्षाच्या तरुणाचा डोक्यात वीट लागून मृत्यू झाला. परमेश्वर सोनुने असं मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. जालन्यातील जाफ्राबाद पोलीस ठाण्यासमोर ही मारहाणीची घटना घडली. मयत तरुण हा जाफ्राबाद तालुक्यातील सावरखेडा गावचा रहिवासी आहे. घटनेनंतर जखमीला सुरूवातीला जाफ्राबाद येथे नंतर जालना येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.दरम्यान या प्रकरणी जाफ्राबाद पोलिसांनी आरोपी राजू सोनुने आणि विजय सोनुने यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक केली आहे. तर वाळू माफियांबरोबरच पोलिसांनीही मारहाण केली त्यामुळे तरुणाचा उपचारा दरम्यान नाही तर घटनास्थळीच मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबियांनी केला. जोपर्यंत मारहाण करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करून कारवाई करत नाही तोपर्यंत मयताचा मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा मयताच्या नातवाईकांनी जालना जिल्हा रुग्णालयात घेतला होता.

# टेंभुर्णीचे भूमिपुत्र डॉ.गणेश चंदनशिवे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचा 'सर्वोत्कृष्ट लोककलावंत' पुरस्कार जाहीर

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** येथील भूमिपुत्र असलेले व सध्या मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख आणि सुप्रसिद्ध सिने-पार्श्वगायक डॉ. गणेश चंदनशिवे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'सर्वोत्कृष्ट लोककलावंत' पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. लोककला क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची ही एक मोठी पावती मानली जात आहे.



हा पुरस्कार सोहळा दिनांक १४ जून २०२५ रोजी मुंबई येथे नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी डॉ. गणेश चंदनशिवे यांना हा बहुमान प्रदान करण्यात येईल.

डॉ. चंदनशिवे यांनी लोककलेच्या जतन आणि प्रसारात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यामुळे लोककलांना शहरी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळाली आहे. एक गायक म्हणून त्यांनी आपल्या आवाजातून अनेक लोकगीते घराघरात पोहोचवली आहेत, तर मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे प्रमुख म्हणून त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे लोककलांना शैक्षणिक आणि व्यावसायिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

यापूर्वीही लोककलेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल डॉ. चंदनशिवे यांना अनेक मानसन्म ान प्राप्त झाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा हा पुरस्कार त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या घोषणेनंतर सर्व स्तरांतून डॉ. गणेश चंदनशिवे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लोककला क्षेत्रासाठी ही एक अभिमानाची बाब मानली जात आहे. डॉ गणेश चंदनशिवे यांना भेटलेल्या या पुरस्कार बद्दल टेंभुर्णी येथील मानव सेवा मंडळाचे सदस्य आणि ग्रामस्थ यांनी फोन द्वारे मेसेज मार्फत त्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले.

# आदिवासी मुलांसाठी शासकीय वसतीगृह प्रवेश सुरू

**जालना -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी जालना येथील संजय नगरातील आदिवासी मुलांच्या वसतीगृहात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असल्यास www.swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करून अधिक माहितीकरिता टोल फ्री क्रमांक १८००२६७००७ या क्रमांकावर संपर्क साधावा.




## पान १ वरुन

### वॉटरग्रीडच्या कामात ...

यांनी केली आहे

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या दि.३१.१२.२०२४ व दि.०३.०१.२०२५ रोजीच्या आदेशानुसार म हाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या मुख्या अभियंता श्रीमती मनिषा पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून समि तीने दि.१४.०१.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार अनियमिततेस जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द म.ना. से. (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम ८ व १२ अंतर्गत मध्यवर्ती कार्यालयाच्या दि. २५.०४.२०२५ च्या ज्ञापनान्वये प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर बी गाढे, श्री. एम. बी. गायकवाड, शाखा अभियंता तथा तत्कालीन उप अभियंता (प्रभारी), श्री एस एस पटेल प्रभारी उपकार्यकारी अभियंता मजीप्रा उपविभाग, मंठा, परतूर व इतर ५ अधिकारी यांना दोषारोप बजावून एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीडचे संपूर्ण बिल अदा करण्यात आले त्यावेळी ५२ गावात पाणी पोहोचलेलेच नव्हते ते आजही आजच्या तारखेत पोहोचलेले नाही. तसेच दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड चे संपूर्ण बील अदा करण्यात आले, त्या तारखेपर्यंत एकही गावात पाणी पोहोचलेले नव्हते. असे असताना अधिकाऱ्यांनी मात्र संबंधित कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक व्यवहार करत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याचा खोटा अहवाल सादर केला आहे. मुख्य अभियंता लोलापाड, अधीक्षक अभियंता कोळी, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमताने आर्थिक व्यवहार करून शासनाला खोटा अहवाल तर सादर केला आहे परंतु आपण वारंवार केलेल्या सूचनेचे व आदेशाची देखील अवहेलना केली आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर ०३ वर्षे संबंधित कंत्राटदाराने सदरील योजना चालवायची आहे त्यानंतरच कंत्राटदराला पूर्ण बिल देणे अपेक्षित आहे, तसा करार व नियम आहे. असे असताना १७६ गाव वॉटर ग्रीड अंतर्गत ५२ गावांमध्ये व ९५ गाव वॉटर ग्रीड मधील सर्व गावांमध्ये पाणी पोहोचलेले नसताना संपूर्ण बिल अदा करण्यात आले अशा बेजबाबदार हलगर्जीपणा करणाऱ्या व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना कदापी माफ करणार नाही असेही आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले.

सदर अनियमिततेप्रकरणी दोषी अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही चालू करण्यात आली असून योजनेचे गांभीर्य विचारात घेता चौकशीची कार्यवाही निःपक्षपातीपणे होण्यासाठी म हाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ४ (१) (अ) मधील तरतूदीनुसार या सर्व अधिकाऱ्यांना आदेशाच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे. याबरोबरच हा आदेश अंमलात असेल तेवढया कालावधीत यांना मुख्य अभियंता कार्यालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही असाही आदेश देण्यात आला आहे अशी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

तसेच निलंबनाच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ व ६९ मधील तरतूदीनुसार निर्वाह भत्ता आणि महागाईभत्ता व इतर पूरक भत्ते मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयातून देण्यात येतील त्यामुळे त्यांनी म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालयात ७ दिवसांचे आत रुजू व्हावे अन्यथा निर्वाह भत्ता बंद करण्यात येईल. याबरोबरच निलंबनाच्या कालावधीत यांना खाजगी नोकरी किंवा धंदा करता येणार नाही. जर त्यांनी निलंबन कालावधीत खाजगी नोकरी किंवा धंदा केला तर ती गैरवर्तणूक समजण्यात येईल व त्या कारणासाठी वेगळ्या शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील आणि तसेच निर्वाह भत्ता मिळण्याचा हक्कही गमावतील. असेही निलंबनाच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे असेही लोणीकरांच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

पुढील एका महिन्यात सर्व गावांमध्ये वॉटर ग्रेडचे पाणी पोहोचेल त्याचप्रमाणे १७६ गावांपैकी केवळ १७ गावांमध्ये तर ९५ गावांपैकी १० गावांमध्ये पाणी पोहोचणे शिल्लक आहे असा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण यांनी आज आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे सादर केला असे असले तरी अधिकाऱ्यांच्या या शब्दांवर आपला विश्वास नसून सोमवारनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी या सर्व अधिकाऱ्यांना सोबत घेऊन आपण संयुक्तरित्या प्रत्यक्ष पाहणी दौरा करणार असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. तसेच ज्या गावांमध्ये अद्याप पर्यंत पाणी पोहोचलेले नाही त्या गावातील लोकप्रतिनिधींनी गटविकास अधिकारी परतूर मंठा किंवा जालना यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार द्यावी असे आव्हान देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केले.

### जिल्ह्यात अवैध ...

केंद्रीय मोटार वाहन नियम यातील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येईल. अधिक माहितीकरिता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,जालना येथे संपर्क साधावा. असेही उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणातील अनियमिता दूर करावी, शुल्क परत करावे

## मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** शिक्षकांसाठी सुरू असलेल्या वरिष्ठ व निवड श्रेणी प्रचंड अनियमितता असून हे प्रशिक्षण शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी आहे की मानसिक त्रास देण्यासाठी आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. अनिवासी असलेल्या आणि सर्व साधनसामुग्री शिक्षकांनाच आणावयास सांगणाऱ्या या प्रशिक्षणासाठी शुल्क मात्र दोन हजार रूपये घेण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांमधे प्रचंड असंतोष,चीड आणि संताप निर्माण झाला आहे. याची त्वरित दखल घेऊन वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणातील अनियमिता दूर करावी आणि शुल्क परत करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी सातत्यपूर्ण शिक्षक प्रशिक्षणाची गरज आहे किंबहुना तो शिक्षण प्रक्रियेचाच भाग आहे. शिक्षण विभागाने यासाठी सातत्याने शिक्षक प्रशिक्षणे आयोजित केली पाहिजेत. मात्र असे होत नाही. बारा व चोवीस वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. पूर्वी त्यासाठी निवासी प्रशिक्षण आयोजित केले जात होते. शिक्षकांना आवश्यक साधनसामग्री शिक्षण विभाग पुरवत असे आणि वर शिक्षकांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली जात होती. ही प्रशिक्षणे निशुल्क होती. शिक्षण विभागाने यावर्षी अनिवासी प्रशिक्षण आयोजित केले आहे. प्रशिक्षण सुरू झाल्यावर त्यासाठी आवश्यक साधनसामुग्री शिक्षकांनाच आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत आणि तरीही शिक्षकांकडून प्रत्येकी दोन हजार रूपये शुल्क घेण्यात आले आहे. बारा आणि चोवीस वर्षाची अर्हताकारी सेवा झालेल्या शिक्षकांनी ऑनलाईन नोंदणी केली, दोन हजार रूपये शुल्क भरले परंतु यादीमधे अनेक शिक्षकांची नावेच आली नाहीत! अनेक शिक्षकांनी एक दोन दिवस प्रशिक्षण घेतल्यावर सिस्टीम मधून त्यांची नावे गायब होत आहेत. अशा शिक्षकांना प्रशिक्षणात बसू दिले जात नसल्याच्या तक्रारी अनेक शिक्षकांनी केल्या आहेत. दोन तीन तालुक्यासाठी आयोजित प्रशिक्षणासाठी शिक्षकांना पन्नास शंभर किलोमीटर प्रवास करावा लागत आहे. यामुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांची प्रचंड गैरसोय होत असून त्यांच्यामधे प्रचंड असंतोष, राग व चीड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन शिक्षक प्रशिक्षणातील अनियमितता दूर करावी. प्रशिक्षण शुल्क परत करावे अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, सदस्य प्रेमदास राठोड आरेफ कुरेशी, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे,जिल्हा सचिव संजय येळवंते,मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे,डॉ पुरुषोत्तम जुन्रे, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद,उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण,प्रद्युम्न काकड,दीपक शेरे, तालुकाध्यक्ष रमेश गाढे, गणेश मेहेत्रे,आनंद वाघ,जनार्दन कुदर,सुधाकर डोईफोडे,बबन लंके,विजयकुमार खरात,विजयकुमार म्हस्के,सदस्य तुकाराम पडघन यांनी केले आहे

# नाथ महाराजांच्या रथ सजावटीसाठी आज जालन्यात चांदी अर्पण सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या ४२५ वर्षांच्या परंपरेने सजलेल्या आषाढी वारी पालखी सोहळ्यातील रथाला पुणे येथे १२० किलो चांदीची सजावट करण्यात येत असून, जालना शहरातूनही ११ किलो चांदीचे योगदान देण्याचा संकल्प करण्यात आला असून, त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अद्यापही संकलन सुरू असून, बुधवार दि. ११ जून रोजी दुपारी ४ वाजता जुना जालन्यातील स्वयंवर मंगल कार्यालयात चांदी अर्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ऐनवेळीही इच्छुक भाविकांना चांदी अथवा रोख स्वरूपात योगदान देता येणार आहे.



नाथ महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याकरीता सागवानाचा नवीन रथ आणि त्याला १२० किलो चांदीचा साज चढविण्याचा संकल्प करण्यात आला असून, १५ जून रोजी रथाला चांदीच्या सजावटीचे काम पूर्णत्वास जाणार आहे. राज्यभरातून भाविक आपापल्या परीने चांदीचे दान करत आहेत. जालना जिल्ह्यातून ११ किलो चांदीच्या योगदानाचा संकल्प केला आहे. आतापर्यंत ९ किलो चांदी संकलित झाली आहे. अर्पण सोहळा सुरू होईपर्यंत संकलन केले जाणार आहे. बुधवारी दुपारी ४ वाजता संत एकनाथ महाराज पालखी सोहळा प्रमुख श्री रघुनाथबुवा नारायणबुवा गोसावी पालखीवाले आणि योगेशबुवा पालखीवाले यांचे पाद्यपूजन करण्यात येऊन संकलित चांदी त्यांच्याकडे रथ सजावटीसाठी अर्पण केली जाणार आहे. यावेळी मुख्य अतिथी म्हणून उद्योजक घनश्याम गोयल, उद्योजक अनिल गोयल, उद्योजक कांतीलाल राठी, उद्योजक संजय राठी, जालना जनसेवा ग्रुप चे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, उद्योजक पन्नालाल बगडिया यांची तर आशीर्वाद देण्यासाठी भगवान महाराज आनंदगडकर, मनोज महाराज गौड, रामदास महाराज आचार्य, किशोरजी तिवारी यांची उपस्थिती राहणार आहे.

याप्रसंगी भाविकांसह चांदी दान देऊ इच्छिणाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा आणि चांदी अर्पण सोहळ्याचे साक्षीदार बनावे, असे आवाहन हरे कृष्ण सत्संग मंडळाच्यावतीने अभय कुलकर्णी, मेघराज चौधरी, दीपक अंभोरे, रामनिवास गौड, सुदेश करवा, प्रसन्ना जाफ्राबादकर, कैलाश चंद्रभानी, भारतीताई नाईक आदींनी केले आहे.

# विजेचा शॉक लागून वडिलांसह मुला-मुलीचा मृत्यू

## जालना तालुक्यातील वरुड नाव्हा गावातील घटना

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील वरुड नाव्हा गावातील विजेचा शॉक लागून वडिलांसह मुलगा आणि मुलीचा मृत्यू झाला आहे.जालना तालुक्यातील वरुड नाव्हा गावात ही घटना घडली आहे. ३२ वर्षीय विनोद म्हस्के असं मयत वडिलांचं नाव असून १० वर्षीय श्रध्दा आणि ७ वर्षीय समर्थ अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावं आहे.आज विनोद म्हस्के त्यांच्या शेतात मल्चिंग पांगवत होते.यावेळी त्यांना उघड्या असलेल्या वायरमुळे शॉक लागला.यावेळी त्यांच्या बाजूला खेळत असलेले श्रद्धा आणि समर्थ त्यांना पिण्यासाठी पाणी घेऊन आलेले असताना त्यांनाही शॉक लागला आणि दोन्हीही लहान मुलं वडिलांच्या अंगावर कोसळले.या घटनेनंतर या तिघांनाही जालन्यातील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी आणण्यात आलं मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. यानंतर नागरिकांनी त्यांना जिल्हा सामान्य घाटी रुग्णालयात दाखल केले घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळ धाव घेत घटनेच्या पंचनामा करून तिघांच्या मृदे शवविच्छेदनासाठी पाठवले असून याप्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास तालुका जालना पोलीस करीत आहे. या घटनेमुळे वरुड नाव्हा परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.




